# प्रेसनोट

राज्यातील वापरायोग्य पाण्याची उपलब्धता मर्यादेत असून गरजेपेक्षा कमी आहे. वाढती लोकसंख्या, वाढते उद्योग व अनियमित पर्जन्यमान यामुळे भविष्यात उपलब्ध पाण्यावरील ताण आणखी वाढणार आहे. उपलब्ध पाणी सर्व वापरकर्त्यांना त्यांच्या गरजेच्या प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने व नियोजनपुर्वक करण्याची आवश्यकता आहे. यासाठी समाजात जलजागृती व जलसाक्षरता निर्माण होण्याची गरज असून त्यादृष्टिने मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली दि. २८/०७/२०१७ रोजी सभा घेण्यात आली. सभेतील निर्देशानुसार यवतमाळ जिल्हयाकरीता, जिल्हा आणि तालुका स्तरावरील जलनायकांची निवड करण्याच्या अनुषंगाने, ऑनलाईन प्रक्रियेद्वारे खालील पदांकरीता स्वयंस्फुर्तीने काम करण्यास इच्छूक असणाऱ्या पात्र उमेदवारांकडून अर्ज दिनांक ०१/०८/२०१७ ते १५/०८/२०१७ पर्यंत मागविण्यात येत आहे. अर्ज भरण्याच्या संदर्भात माहिती **yavatmal.nic.in** वर उपलब्ध आहे. जलनायक (जिल्हास्तर) जलप्रेमी एकुण - १० पदे व जलनायक (तालुकास्तर) जलदुत- एकुण १२ पदे प्रती तालुका याप्रमाणे निवड करावयाची आहे. निवडी संदर्भातील पात्रतेचे निकष खालील प्रमाणे राहिल.

**जलनायक (जिल्हा स्तर) जलप्रेमी निवडीचे निकष**

१. जलनायक (जिल्हा स्तर) हा संबंधित जिल्हयात राहणारा असावा.
२. शक्यतो कोणत्याही शाखेचा पदवीधर.

**जलनायक (तालुका स्तर) जलदुत निवडीचे ईतर निकष**

१. जलनायक (तालुका स्तर) जलदूत हा संबंधित तालुक्यात राहणारा सज्ञान असावा.
२. शक्यतो १२ वी / पदविका उत्तीर्ण असावा.

**वरील दोन्ही पदाकरीता सर्वसाधारण निकष**

१. संगणकिय संपर्काचे ज्ञान आवश्यक.
२. प्रवास, सूक्ष्म निरीक्षण व निरीक्षणांचे विश्लेषण तसेच निष्कर्षात्मक मांडणी करण्याची आवड व कौशल्य.
३. जलविषयक शासकिय, अशासकिय/समाजसेवी संस्थांशी संबंधित प्रशिक्षक असल्यास प्राधान्य.
४. जलसंधारणाबाबत पुरेसे ज्ञान.
५. निवडीमध्ये महिलांना प्राधान्य.
६. जलक्षेत्रातील कामाकाजाचा अनुभव.
७. चांगले चारित्र्य.

**अर्जासोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.**

१. शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र
२. आधारकार्ड / पॅन कार्ड
३. जलक्षेत्रात काम करण्याचा अनुभव असल्यासंबंधी प्रमाणपत्रे
४. चारित्र्याचे प्रमाणपत्र

**जिल्हाधिकारी यवतमाळ**